MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १९ अंक : २ पाने : ८ फेब्रुवारी-मार्च २०२४ www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

स्त्री-पुरुष समानता (Gender Equality) म्हणजे काल जी कामे पुरुष करत होते, ती कामे आज स्त्रिया करू लागल्या आहेत, असे नसून स्त्री कुठे कमी नाही, याचा एक विश्वास निर्माण करणे होय. त्यामुळेच यावेळच्या आठ मार्चला महिला दिनानिमित्त अनेक कंपन्या आणि सरकारी कार्यालयात पुरुषांची पारंपरिक कामे स्त्रियांनी अतिशय समर्थपणे करून दाखविली आहेत. अगदी वैमानिकांसह सर्व महिला कर्मचारी असलेले विमान उड्डाण आपण पाहिले आणि लष्करातही महिला स्वतंत्रपणे जोखमीची कामे पार पाडत आहेत, असेही दिसले. आपल्या

- **महिलांचा सन्मान होणे आवश्यक**
- **ऐरोली नॉलेज पार्कचा केला गौरव**
- **विजक्षेत्रात महिलांचे योगदान मोठे**
- **सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर**

कंपनीत वाशी परिमंडळातील कळवा मंडळांतर्गत येणारे २२० के. व्ही. ऐरोली नॉलेज पार्क हे महिला उपकेंद्र म्हणून आपण ओळखतो आणि त्याला यादृष्टीने विशेष महत्त्व आहे.

ऐरोली नॉलेज पार्क उपकेंद्राची स्थापित क्षमता १५० एम.व्ही.ए. (३x५० एम.व्ही.ए.चे रोहित्र) असून या उपकेंद्रास दोन २२० के. व्ही. वाहिन्या व २२ के. व्ही. चे १२ फिडर्स जोडलेले आहेत. या उपकेंद्रात महिला कार्यरत आहेत. या सर्व महिला कर्मचारी कर्तव्यदक्ष, प्रामाणिक, कार्यक्षम तर आहेतच. पण, उपकेंद्राची उपलब्धता ठेवण्यासाठी त्या कुठेच कमी पडत नाहीत, असा अनुभव या उपकेंद्राने दिला आहे. हा अनुभव यासाठी महत्त्वाचा आहे की मानवी विकासात तंत्रज्ञानाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ज्यांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार केला, ते समूह, गट पुढे गेले. स्त्री आणि पुरुष या दोन समूहाबाबतही पाहिले तर घराबाहेर जास्त काळ राहणाऱ्या पुरुष समूहाचा आणि तंत्रज्ञानाचा लवकर संबंध आला. पण, त्याने हे तंत्रज्ञान महिला वर्गापर्यंत पोहोचविले नाही. महिला दिन आणि बदलत्या जगात महिलांच्या समस्यांची चर्चा वाढू लागली. त्यातून तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे, असा विचार वेळोवेळी मांडला जाऊ लागला. आता तर महिला पुरुषांच्या पुढे एक पाऊल जाऊन तंत्रज्ञान स्वीकारत आहेत. वाशी परिमंडळातील कळवा मंडळ अंतर्गत येणारे २२० के. व्ही. ऐरोली नॉलेज पार्क हे महिला उपकेंद्र झाले, हा असाच तंत्रज्ञानाचा स्वीकार होय.

संवेदनशील आणि अवघड किंवा जोखमीची मानली जाणारी कामे महिला सातत्याने करत आहेत, हे विशेष आहे. उदा. उपकेंद्रातील उपकरणाचे टेस्टिंग व डायग्नोस्टिक करताना रोहित्राच्या वर चढून बुशींगचे जंपर काढणे व लावणे, सर्किट ब्रेकर, लाईटनींग अरेस्टर, अर्थिंग रॉड टाकणे, सी.टी.,पी.टी.चे टॅन डेल्टा पॉईंट काढून टेस्ट करणे. तसेच उपकरणाच्या नियमित देखभालीची कामे जसे की, बे मेंटेनन्समधील हॉटस्पॉट अटेंड करणे म्हणजे नट बोल्ट टाईट करणे व बदलणे, आयसोलेटर व ब्रेकर ऑईलींग, ग्रिसींग करणे आदी कामे या महिला स्वतंत्रपणे करतात. अशा प्रकारे देखभालीच कामे करीत असताना त्या महिला तिन्हीही शिफ्टमध्ये ऑपरेशनची कामेसुद्धा सांभाळतात. सोबतच वितरण अधिकारी, कर्मचारी व ओपन ॲक्सेस ग्राहकांशी सुसंवाद साधून कंपनीचे उद्देश साध्य करत आहेत.

महिलांनी उपकेंद्र चालविण्याचा हा प्रकल्प जाणीवपूर्वक करण्यात आला आणि तो यशस्वी झाला. २२० के. व्ही. ऐरोली पार्क महिला उपकेंद्र नावारुपाला आले. या महिलांनी उपकेंद्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी व परिश्रम करून उपकेंद्राचे नाव उज्ज्वल केले आहे.

आपल्या कंपनीतही महिला पुढे सरसावल्या आहेत. कोल्हापुरात झालेल्या आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धेत महिलांनी चमकदार कामगिरी केली. विविध स्पर्धा, परिषदा यामधून महिला अधिकारी व कर्मचारी आपल्या कामाचा ठसा उमटवित आहेत, ही खरंच गौरवाची व आनंदाची बाब आहे. कार्यालयातील राज्य पारेषण उपक्रम, अभिकल्प, कंत्राटे व अनुश्रावक, संचलन व सुव्यवस्था, चाचणी स्वयंचलन आणि दूरसंचार विभाग, मानव संसाधन, वित्त, राज्य भार प्रेषण केंद्र, स्थापत्य,



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

ईआरपी, कंपनी सचिव, दक्षता, विधी विभागात महिला चांगल्या कौशल्याने काम करीत आहेत.

अर्थात, ही वाटचाल येथेच थांबता कामा नये. या उदाहरणांवरून अधिकाधिक महिला पुढे येतील, त्या प्रेरणा घेतील आणि स्त्री आणि पुरुष खांद्याला खांदा लावून प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि देश प्रकाशमान करतील, असा विश्वास वाटतो.

आणखी एक महत्त्वाचा संकल्प यानिमित्ताने करण्याची गरज आहे. तो आहे आपल्या समाजातील स्त्री–पुरुषांच्या संख्येचे संतुलन. गेले काही दशके पुरुषांच्या तुलनेत महिलांची संख्या कमी होते आहे आणि त्याचे गंभीर परिणाम समाज भोगतो आहे. सरकारने या प्रश्नी अनेक योजना सुरु केल्या आहेत. त्या योजनांचा प्रसार करणे, त्याविषयी सतत चर्चा करणे आणि आपल्या कुटुंबात मुलगी आणि मुलगा यातील भेद कमी करणे, या गोष्टी आपण सहजच करू शकतो. या महिला दिनानिमित्त संकल्प करूयात की, स्त्री–पुरुष सहजीवनातून हे जग अधिक सुंदर करण्यासाठी आपल्या प्रत्येकाचा हातभार लागेल.

**शुभेच्छांसह..!**

**–डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




**भाईंदर :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वतीने भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये आयोजिलेल्या दोन दिवसीय स्वयंचलन (ऑटोमेशन) परिषदेचे उद्‌घाटन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. शेजारी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, श्री. महेश भागवत.

### ▶ महापारेषणची दोन दिवसीय स्वयंचलन परिषद

# अभियंत्यांनी नावीन्यपूर्ण कामांवर भर द्यावा : डॉ. संजीव कुमार

Follow us on :

विजक्षेत्रात झपाट्याने मोठे बदल होत आहेत. विशेषतः तंत्रज्ञानामुळे विजक्षेत्रात आमुलाग्र क्रांती झाली आहे. त्यामुळे अभियंत्यांनी आपल्या कामांमध्ये सुधारणा करून नावीन्यपूर्ण कामे करण्यांवर भर दिला पाहिजे``, असे आवाहन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) च्या वतीने भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे दोन दिवसीय स्वयंचलन (ऑटोमेशन) परिषद आयोजिली होती. या परिषदेचे उद्‌घाटन डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उपस्थित अभियंत्यांना मार्गदर्शन करताना डॉ. संजीव कुमार बोलत होते. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, स्वयंचलन, दूरसंचारण, नवकल्पना व विद्युत संरक्षण प्रणालीचे मुख्य अभियंता श्री. शशांत जेवळीकर, राज्य भार प्रेषण केंद्राचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, मुख्य




अभियंता श्री. पीयूष शर्मा उपस्थित होते.

डॉ. संजीव कुमार पुढे म्हणाले, गेल्या दोन दशकात विजक्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. त्यामुळे अभियंत्यांनीही आपल्या कामांमध्ये योग्य ते बदल करून सृजनशील व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. जागतिक पातळीवर कोणते बदल होत आहेत, याचा चिकित्सक अभ्यास करून आव्हानांना तोंड दिले पाहिजे.`` प्रास्ताविकात श्री. शशांक जेवळीकर यांनी महापारेषणसमोरील आव्हाने, स्वयंचलन (ऑटोमेशन) क्षेत्रातील बदल, सायबर सुरक्षा व नावीन्यपूर्ण कामे याविषयी माहिती दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महापारेषणच्या स्वयंचलन व विद्युत संरक्षण प्रणालीचे अधीक्षक अभियंता श्री. विशाल वाघचौरे, श्री. सुधीर ढवळे, प्रशिक्षण विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. संजीवकुमार बद्देला आणि स्वयंचलन, दूरसंचारण, नवकल्पना व विद्युत संरक्षण प्रणाली टीमने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमती विभावरी बाविस्कर यांनी मानले.

### विविध विषयांवर प्रशिक्षण घ्या: डॉ. संजीव कुमार

प्रशिक्षण विभागाने यापुढेही मानव संसाधन व अभियंत्यांसाठी नवनवीन विषयांवर आधारित प्रशिक्षण आयोजित केले पाहिजे. प्रशिक्षणामुळे कामांत सकारात्मक बदल होतील. आपल्या काही सूचना असतील तर थेट माझ्याशी बोला. चांगल्या सूचनांचे स्वागत करून तातडीने अंमलबजावणी करू, असे डॉ. संजीव कुमार यांनी सांगून दोन दिवसीय परिषदेला शुभेच्छा दिल्या.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

# महापारेषणच्या संचालकपदी (संचलन)
# श्री. सतीश चव्हाण



महापारेषणच्या संचालकपदी (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली. श्री. चव्हाण यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथून विद्युत अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या सुमारे ३७ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी पारेषण आणि वितरण विभागामध्ये स्टील आणि ऊर्जा क्षेत्रात शिकाऊ अभियंता ते संचालक, बोर्ड सदस्य अशा विविध पदांवर काम केले आहे.

त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये (महावितरण) भार व्यवस्थापन, वीज खरेदी, नियामक आणि वाणिज्य विभाग, ऊर्जा संक्रमण व्यवस्थापन, संचलन आणि देखभाल अशा विविध विभागामध्ये १२ वर्षे अधीक्षक अभियंता ते संचालक (वाणिज्य) स्तरापर्यंत उत्कृष्ट काम केले आहे. त्यापूर्वी त्यांनी सात वर्षे महापारेषणच्या प्रकल्प विभागात उपकार्यकारी अभियंता म्हणूनही काम केले आहे. त्यांनी भारतात व परदेशात विविध स्टील कंपन्यांच्या विद्युत प्रकल्प व देखभाल विभागात देखील उल्लेखनीय काम केले असून त्यांना कामाचा मोठा अनुभव आहे.

त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री सौरऊर्जा कृषी वाहिनी' सारख्या महत्त्वाकांक्षी योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रमुख जबाबदारी पार पाडली आहे. या योजनेच्या जून २०१७ च्या संकल्पनेपासून ते २०२३ मध्ये एमएसकेवीवाय २.० म्हणून पुनर्रचना करेपर्यंत कार्य केले आहे. आता ही योजना भारतातील कृषी फीडर्ससाठीची सर्वात मोठ्या सौरीकरण कार्यक्रमाच्या स्वरूपात परिवर्तीत होणार आहे. तसेच एचटी उपभोगत्यांसाठी केव्हीएएच बिलिंगची अंमलबजावणी, ओपन ॲक्सेसच्या बाबतीत तर्कसंगतीकरण, एफबीएसएम ते डीएसएममध्ये सेटलमेंट यंत्रणा बदलपर्यंतच्या कार्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठा अनुभव असून ऊर्जा क्षेत्रामधील अभियांत्रिकी, वाणिज्य, अर्थशास्त्र, कायद्यांशीसंबंधित समस्यांना सामोरे जाण्यासाठी विशेष कौशल्याचा त्यांचा अभ्यास आहे.

# महापारेषणच्या संचालकपदी (प्रकल्प)
# श्री. अविनाश निंबाळकर



महापारेषणच्या संचालकपदी (प्रकल्प) (प्रभारी) श्री. अविनाश निंबाळकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना संचालक (प्रकल्प) पदाचा कार्यभार दि. २१.०२.२०२४ पासून सोपवण्यात आला आहे. श्री. निंबाळकर यांनी १९९० मध्ये नागपूर विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आहे. सीओईपी, पुणे येथून एमई (डिजिटल सिस्टीम) करून ते संशोधन आणि विकास अभियंता म्हणून कॉन्सेप्ट इंटिग्रेशन, पुणे येथे रूजू झाले. त्यांनी इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली येथून एमबीए (फायनान्स) केले आहे. ते सध्या आयआयएम, नागपूर येथून प्रोजेक्ट मॅनेजमेंटमध्ये स्पेशलायझेशन देखील करीत आहेत.

ते १९९४ मध्ये पूर्वीच्या मराविमं (MSEB) मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर २००६ मध्ये त्यांची थेट भरतीव्दारे कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. त्यांनी २००६ ते २०१४ पर्यंत एच.व्ही.डी.सी. चंद्रपूरमध्ये काम केले. त्यांना २०१४ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून पदोन्नती मिळाली. त्यांनी सांघिक कार्यालय, मुंबई येथे अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) म्हणून काम केले. त्यावेळी त्यांनी अभियंते आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी विविध आयआयटी व आयआयएमसोबत करार केले. त्यानंतर २०१५ ते २०२२ या कालावधीत त्यांची नागपूर प्रकल्प मंडळात नियुक्ती झाली. त्यांची २०२२ मध्ये थेट भरतीमध्ये मुख्य अभियंता म्हणून निवड झाली. डिसेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२४ या कालावधीत मराठवाडा विभागातील छत्रपती संभाजीनगर परिमंडळामध्ये त्यांची नियुक्ती झाली. त्यांना नवीन अउदा उपकेंद्र व पारेषण वाहिनी नियोजन व बांधकामामधील २२ वर्षांचा अनुभव आहे. महापारेषणमधील विविध नवीन प्रकल्पांची अंमलबजावणी आणि विविध नवीन उपकेंद्र २२० के. व्ही. परभणी, १३२ के. व्ही. नागपूर, ४०० के. व्ही. कोराडी-२, ४०० के. व्ही. चंद्रपूर-२, ४०० के. व्ही. कोराडी-वर्धा, ४०० के. व्ही. चंद्रपूर-वरोरा आणि अन्य २२० के. व्ही. १३२ के. व्ही. उपकेंद्र व वाहिनींचे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यान्वित झाल्या.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे फेब्रुवारी-मार्च २०२४

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुनील शेरेकर | मुख्य अभियंता (पारेषण) | संवसु विभाग, मुख्य कार्यालय, मुंबई | २९. ०२. २०२४ |

आमच्याशी कनेक्टेड रहा

@maha_transco | @maha_transco | MahaTransco

MahaTransco | Mahatranscoltd | MahaTransco



**मुंबई :** महापारेषणच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमप्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी महिलावर्ग.

### महापारेषणमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

# महिलांनी स्वसंवाद वाढविला पाहिजे : धनलक्ष्मी पटवर्धन

## महापारेषणच्या प्रगतीत महिलांचा मोठा वाटा : डॉ. संजीव कुमार

महापारेषणचा विकास व प्रगतीत महिलांचा मोठा वाटा आहे. परिमंडलात महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नेहमीच चांगली कामगिरी केली आहे, याचा कंपनीला मोठा अभिमान आहे. यापुढेही महिला अधिकारी व कर्मचारी चांगली कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावतील, असे महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी सांगून जागतिक महिला दिनानिमित्त भरभरून शुभेच्छा दिल्या.

Follow us on :

'महिलांचा नेहमीच परस्परसंवाद, सुसंवादावर भर असतो. आता त्यांनी आत्मसंवाद, स्वसंवाद वाढविला पाहिजे', असे मत समुपदेशक तथा द लिंक प्रशिक्षण व विकास संस्थेच्या प्रमुख सल्लागार श्रीमती धनलक्ष्मी पटवर्धन यांनी केले. महापारेषणच्या वतीने वांद्रे येथील मुख्य कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणावर संवाद स्त्री मनाचा या कार्यक्रमात श्रीमती पटवर्धन बोलत होत्या. यावेळी महिलांसाठी विविध उपक्रम व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते.

श्रीमती पटवर्धन पुढे म्हणाल्या, 'महिलांनी सर्वच क्षेत्रात क्रांती केली आहे. विविध क्षेत्रात महिलांनी त्यांच्या कामांनी वेगळा ठसा उमटविला आहे. महिलांनी प्रभावी संवादासोबतच आत्मसंवाद केला पाहिजे. महिलांनी आपल्या दैनंदिन कामात ताणतणावाचे व्यवस्थापनही चांगल्या पध्दतीने केले पाहिजे.'



यावेळी महापारेषणच्या मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या वतीने महिला अधिकाऱ्यांना मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे यांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. महेश आंबेकर, श्री. राजेश पाटील, श्री. सुनील गडलिंग, श्रीमती रेणुका नाटके, श्रीमती सीमा डुबेवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती मंजिरी तारगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती वृषाली राऊत यांनी मानले.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in



**ऐरोली :** महापारेषणच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजिलेल्या कार्यक्रमप्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी महिलावर्ग.

8 march
International Women's Day

### महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र ऐरोली

# जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

Follow us on :

ऐरोली येथील महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी समूपदेशक श्रीमती भाग्यश्री घोसाळकर यांचा `अंतर्भाव' हा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये त्यांनी महिलांना केवळ नेतृत्वगुण विकसित करण्यावर भर न देता, सृजनशील बदल करून आव्हानांवर मात करणाऱ्या व्हा, असा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीचे मुख्य अभियंता श्री. महेश भागवत होते. महिलांनी विविध क्षेत्रात चांगली कामगिरी केली आहे. महिलांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आदर्श ठेवून आपले नाव कमवावे. प्रशिक्षणातून प्रेरणा व ऊर्मी घेऊन आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये यशस्वी व्हावे, अशा शुभेच्छा श्री. महेश भागवत यांनी यावेळी दिल्या.

या प्रशिक्षणातून प्रेरित होऊन आपल्या दैनंदिन कामकाजामध्ये या कौशल्याची अंमलबजावणी करून स्वतःमध्ये नियमित सुधारणा करावी. त्यासाठी स्वतःशीच स्पर्धा करून एकमेकांना सहकार्य करावे, अशी भावना सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती स्वाती यंबल व कार्यकारी अभियंता (स्काडा, आर.ई.एम.सी.) श्रीमती वर्षा शिंदे यांनी सांगितले.



**ऐरोली :** येथील महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, श्री. गिरीश पंतोजी, श्री. उमेश भगत, श्री. मिलिंद देवळे, श्रीमती स्वाती यंबल, श्रीमती वर्षा शिंदे.

याप्रसंगी श्रीमती भाग्यश्री घोसाळकर यांच्या हस्ते महिलांना बॅज व भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकारी संचालक (प्र.) (महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता श्री. महेश भागवत, अधीक्षक अभियंता श्री. गिरीश पंतोजी, श्री. उमेश भगत, श्री. मिलिंद देवळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. योगेश अघोर यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती

# महापारेषणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी




**मुंबई :** येथील महापारेषणच्या मुख्य कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून उपमहाव्यवस्थापक (मा. सं. आस्थापना) श्री. अभय रोही, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) तथा राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतीश जाधव.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, उपमहाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. नितीन कांबळे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. अभय रोही, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाशिक परिमंडळाच्या वतीने शिवजयंती साजरी

Follow us on :

नाशिक परिमंडळाच्या वतीने प्रकाशकुंभ या इमारतीत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. नवनीत यशवंतराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी परिमंडळ कार्यालयाचे सर्व अधिकारी, कर्मचारी व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांच्या पाल्यासाठी बाल शिवाजी व आई जिजाऊ या वेषभूषेसाठी स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच रांगोळी स्पर्धाही घेण्यात आल्या. सुरूवातीला प्रा. नवनीत यशवंतराव यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे होते. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करून कार्यक्रमाचा समारोप झाला.





# आमच्याशी कनेक्टेड रहा

Follow us on :









जनजागृती

## पतंग उडविताना विद्यार्थ्यांनी खबरदारी घ्यावी

# वाहिनी देखभाल उपविभाग, पिंपरी चिंचवडतर्फे विद्युत सुरक्षा अभियान



**पिंपरी चिंचवड :** उच्चदाब वाहिनीजवळ पतंग उडविताना खबरदारी घेण्याचा दृष्टीने वाहिनी देखभाल उपविभाग, पिंपरी चिंचवड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा अभियान राबविण्यात आले. या अभियानाला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

Follow us on :

उच्चदाब वाहिनीजवळ पतंग उडविताना खबरदारी घेण्याचा दृष्टीने वाहिनी देखभाल उपविभाग, पिंपरी चिंचवड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा अभियान राबविण्यात आले. या अभियानाला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

उच्चदाब वाहिन्याजवळ पतंग उडविण्यामुळे होणारा संभाव्य धोका व अपघात याबद्दल विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण करण्यात आले. तसेच सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी पत्रिकेचे वाचन करून जनजागृती करण्यात आली.

यामध्ये गणेश इंटरनॅशनल स्कूल, चिखली, सिध्दीविनायक पब्लिक स्कूल, मोरेवस्ती, गुरूमैय्या प्रभाकंवरजी प्राथमिक विद्यामंदिर, चिंचवड, कै. आबाजी रामभाऊ भूमकर प्राथमिक शाळा, भूमकरवस्ती, वाकड, युरो किडस स्कूल, भूमकरनगर, कॅम्ब्रीज इंटरनॅशनल



स्कूल, मोशी, पुणे येथे हा उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमामध्ये अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, पिंपरी चिंचवड येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. तत्त्वशील मस्के, उपकार्यकारी अभियंता श्री. पुष्पक चौधरी व इतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. या उपक्रमाकरिता अउदा संवसु मंडळ, पुणेचे अधीक्षक अभियंता श्री. विठ्ठल भुजबळ व अउदा संवसु विभाग, पिंपरी चिंचवडचे कार्यकारी अभियंता श्री. दीपक मदने यांनी मार्गदर्शन केले.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.